# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 12/2024 दिनांक : 06.01.2024**

## 1)घरफोडी :–

**मनाठा :–** दिनांक 04.01.2024 रोजी 21.45 वा. ते दिनांक 05.01.2024 रोजी 10.00 वा. चे दरम्यान, **चैतन्य बार अॅन्ड रेस्टारंट मनाठा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे बारचे लोखंडी शटरचे कुलुप तोडून आत प्रवेश करून बारमधील विदेशी दारूच्या बाटल्या व कॉउंटर मधील नगदी असा एकुण 7,000/रूपयाचा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी चैतन्य सुरेंद्र जयस्वाल, वय 25 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. मनाठा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरन 02/2024 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/श्री गिरी,** हे करीत आहेत.

## 2)मो.सा.चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 04.01.2024 रोजी 22.30 वा. ते दिनांक 05.01.2023 रोजी 07.10 वा. चे दरम्यान, **व्यंकटेश नगर हिंगोली गेट नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मोटार सायकल क्रं. एम.एच.–26/सीएफ–1490 किंमती 50,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेऊन हनुमान मदिंराचे पाठीमागे जाळून नुकसान केले. वगैरे **फिर्यादी संदिप गणपतराव मुरकुटे, वय 34 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. व्यंकटेश नगर हिंगोली गेट नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 08/2024 कलम 379,435 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/452 उतकर, मो.क्रं. 9921155166** हे करीत आहेत.

## 3)शासकीय कामात अडथळा :–

**देगलूर :–** दिनांक 05.01.2024 रोजी 09.20 वा. चे सुमारास, **अण्णा भाऊ साठे सभागृह नवी आबादी मंडगी ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे शासनाचे वतीने विकसीत भारत संकल्प यात्रा अभियानाचे शासकीय काम करत असताना यातील नमुद आरोपीने विकसीत भारत संकल्प यात्रा अभियानाचे रथाचे सहा बॅनर व एक एल.ई.डी.स्क्रिन डॅमेज करून एकुण किंमती 1,00,000/–रूपयाचे नुकसान करून शासनाचे कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी सुधीर रामभाऊ मराठा, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी ग्रामसेवक पंचायत समिती देगलूर रा. कदमनगर ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 17/2024 कलम 353,427,504 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मुंढे,** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**अर्धापूर :–** दिनांक 03.01.2024 रोजी 22.00 वा. चे सुमारास, **हिंगोली ते अर्धापूर रोडवर श्री किसन बापू आश्रम जवळ अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1) किशन प्रभाकर मोरे, वय 35 वर्ष 2) हरिश मथुराम गट्टानी वय 49 वर्ष रा. नंदीग्राम सोसायटी, नांदेड** हे स्कुटी क्रं एमएच–26/बीएम–2026 वर बसुन जात असतांना त्यांचे पाठीमागुन येणारी जिप क्र एमएच–26/सीई 4100 चे चालकाने त्यांचे ताब्यातील जिप हयगय व निष्काळजी पणे भरधाव वेगात चालवुन स्कुटीला पाठीमागुन जोराची धडक देवुन मयताचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी प्रभाकर भुंजगराव मोरे, वय 50 वर्षे, रा. नंदीग्राम सोसायटी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं. 07/2024 कलम 279,338,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बुध्देवार, मो.क्रं. 9970732468** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड